# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

महाराष्ट्र पोलीस

~~सोशल मिडिया~~

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION/ ४८ /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056
दिनांक :–04102017 ०५

१२२६
०५/१०/२०१७

**–:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–**

उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. २ व ३ मधील नेहरू चौक ते शिरू चौक या दरम्यान मुख्य बाजारपेठ असल्याने दिपावली सणानिमीत्त नागरीकांची खरेदीसाठी मोठया प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी अमित कां.काळे, पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा ,ठाणे शहर पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

१)उल्हासनगर कॅम्प नं. २ मधील नेहरू चौकाकडून शिरू चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग**:– सदरची सर्व वाहने नेहरू चौक –देवी भवानी चौक–गोल मैदान येथून उल्हासनगर –१ मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दि. ०८/१०/२०१७ ते दि. २१/१०/२०१७ रोजी सकाळी ०९.०० ते रात्रौ २३.०० वा. दरम्यानच्या वेळेत अंमलात राहिल. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका;उल्हासनगर.
प्रत माहिस्तव:– मा.जिल्हाधिकारी,ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण/विभाग नियंत्रक;महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा,ठाणे
प्रत:– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, १ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व प्रभारी अधिकारी,उल्हासनगर व विठ्ठलवाडी वाहतूक शाखा.
२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.